प्रेस नोट

दिनांक २०/१०/२०२१

**आरोपी लोकसेवक रहिम पापमिया शेख, वय ३० वर्षे, पद– टेक्निशियन, वर्ग–३, नेमणुक– हंडरगुळी, शाखा हाळी, महावितरण कार्यालय शिरूर ताजबंद, जि. लातुर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांना त्यांचे विद्युत मिटरसाठी केलेल्या ऑनलाईन अर्जाचे अनुषंगाने कनेक्शनसाठी परिपुर्ण कागदपत्र उपलब्ध नसताना कसलीही त्रुटी न काढता, मदत करून विद्युत कनेक्शन देण्यासाठी २५००/– रूपये लाचेची मागणी केली बाबतची तक्रार दिनांक २०/१०/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर यांच्या कडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दिनांक २०/१०/२०२१ रोजी १२.३९ वा पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक टेक्निशियन रहिम शेख यांनी तक्रारदार यांच्या विद्युत मिटरसाठी केलेल्या ऑनलाईन अर्जाचे अनुषंगाने कनेक्शनसाठी परिपुर्ण कागदपत्र उपलब्ध नसताना कसलीही त्रुटी न काढता, मदत करून विद्युत कनेक्शन देण्यासाठी २५००/– रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

आरोपी लोकसेवक टेक्निशियन रहिम शेख यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्यासाठी तक्रारदार यांना दिनांक २०/१०/२०२१ रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक, साई टी हाउस, हंडरगुळी येथे पाठविले असता आरोपी लोकसेवक टेक्निशियन रहिम शेख यांनी २५००/–रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम १४.०५ वाजता पंचासमक्ष छत्रपती शिवाजी महाराज चौक, साई टी हाउस, हंडरगुळी येथे स्वत: स्विकारली आहे म्हणुन त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

तक्रारदार यांनी आरोपी लोकसेवक यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन वाढवणा येथे कलम ७ ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हाचा तपास पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक पंडीत रेजितवाड, सपोउपनि संजय पस्तापुरे, पोह/चाटे, दामटे, कठारे, पोना/संतोष गिरी, मपोना/शिवकांता शेळके, पोना/अमर वाघमारे, पोका/शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, संदीप जाधव, दिपक कलवले, मपोशि रुपाली भोसले, पोका/मंगेश कोंडारे, गजानन जाधव, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील कमांकावर संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.श्रीमती कल्पना बारवकर,<br>पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र | :– मोबाईल कमांक ८८८८८४१९६५ |
| २) | पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधिक्षक | :– मोबाईल कमांक ९३०९३४८१८४ |
| ३) | टोल फ्री हेल्पलाईन कमांक | :– १०६४ |
| ४) | कार्यालयाचा फोन कमांक | :– ०२४८२–२४२६७४ |
| ५) | Website | :– www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :– www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :– www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

पोलीस उपअधिक्षक ... लातूर